# Indian Streams Research Journal

International Recognized Multidisciplinary Research Journal

ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 6 | Issue - 1 | Feb - 2016




## “ग्रामीण विकासात कृषी क्षेत्राची भूमिका”


पाटील व्ही. एच.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सी.टी. बोरा महाविद्यालय,


शिरुर (घोडनदी) शिरुर , पुणे.



**प्रस्तावना**

सर्वसाधारणपणे आर्थिक विकास अशी निरंतर प्रक्रिया आहे की त्या देशांतर्गत सर्व उपलब्ध संसाधनाचा कार्यक्षम वापर करुन दिर्घ काळात राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नात सातत्याने वृध्दी होते. आर्थिक विषमता कमी होवून सामान्य लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात व कल्याणात वाढ होते. देशाचा आर्थिक विकास, समृध्दी ही कृषी व उदयोगाच्या विकासावर अवलंबून असते. २१ व्या शतकात विकसित अर्थव्यवस्था म्हणून प्रचलित असणाऱ्या राष्ट्रांच्या विकासांच्या अवस्थांचा इतिहास अभ्यासला असता असे दिसून येते की विकसित राष्ट्रांच्याही विकास प्रक्रियेत शेती क्षेत्राने अतिशय महत्वाची भूमिका पार पाडलेली आहे.


भारत हा अधिक लोकसंख्येचा व ग्रामिण अर्थव्यवस्थेचे प्राबल्य असलेला खेडयांचा देश आहे. शहरापेक्षा खेडयांची संख्या देशात जास्त आहे. २०११ च्या जनगननेनुसार ६४०८६७ इतकी खेडयाची संख्या भारतात आढळते व ग्रामीण भागात ८३३,०८७,६६२ लोकसंख्या वास्तव्य करते. खेडी हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग मानला जातो. *‘खरा भारत हा खेडयात राहतो’* असे महात्मा गांधी म्हणत असत. गांधीजीची ग्राम स्वराज्य व रामराज्याची संकल्पना ही खेडयावर आधारित होती. पूर्वी खेडी स्वावलंबी होती आणि ग्रामिण अर्थव्यवस्था स्वयंचलित होती परस्परावरील प्रेम आणि सहकार्य या पायावर ग्रामिण अर्थव्यवस्था उभी होती. ग्रामिण विकास म्हणजे देशाचा विकास असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. त्यामुळे ग्रामिण विकासाची संकल्पना महत्वाची ठरते.



### ग्रामीण विकासाची व्याख्या:-

भारतीय अर्थव्यवस्थेची विभागणी ग्रामीण व शहरी अशा दोन भागात झाली आहे. भारत हा खेडयांचा देश आहे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामीण विकासाचे महत्व आहे. कारण आजही ७२ % लोकसंख्या ग्रामीण भागातच आहे. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला विकसित अर्थव्यवस्थेमध्ये रुपांतर करण्यासाठी ग्रामीण भारताच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीला मूर्त स्वरुप देणे गरजेचे आहे.

१. “ग्रामीण विकास म्हणजे खेडयांची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी केलेले कार्य होय”
२. “ग्रामीण विकास ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे ग्रामीण जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणली जाते”. - *भारतीय नियोजन आयोग*
३. “ग्रामीण विकास ही अशी पध्दती आहे की, ज्यात ग्रामीण भागात राहणारे लोक स्वतःची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी व इतरांना सहकार्य करण्यासाठी सहभागी होतात” – *कार्ल टेलर*
४. “सरकार व जनता दोहोंच्या संयुक्त प्रयत्नाद्वारे सर्वसमाजाच्या आर्थिक सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमास हातभार लावण्यासाठी शिक्षण देणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय” *-संयुक्त राष्ट्रे*

५. ग्रामीण विकासात शेती, पशुपालन, जलसिंचन, सहकार, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण दळणवळण, ग्रामपंचायत, उदयोग, सामाजिक विकास इ. घटक ज्यांचा भारतीय लोकसंख्येच्या ग्रामीण भागाशी संबंध आहे त्यांचा समावेश होतो" – *भिडे एस. के.*

थोडक्यात वरील सर्व व्याख्यामध्ये ग्रामीण विकासामध्ये स्थानिक नागरी व सरकार यांच्या संयुक्त प्रयत्नातून परिवर्तन घडवून आणावयाचे यावर भर दिलेला आहे. कृषि हा ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू असून त्यास सहकाराची जोड दयावयाची आहे. ग्रामीण विभागातील नागरिकांच्या जीवनामध्ये अमूलाग्र बदल करण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न करावयाचे आहेत. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगती घडवून आणण्याचा प्रयत्न करणे हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास होय.

### ग्रामीण विकासाची उद्दिष्टे:-

१. खेडी स्वावलंबी बनविणे
२. ग्रामीण भागात मूलभूत सुविधांची निर्मिती करणे.
३. लघु व कुटीर उदयोगांचा विकास करणे.
४. सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकासास चालना देणे.
५. स्थानिक पातळीवर जबाबदार व कार्यक्षम नेतृत्व विकसित करणे.
६. शेती क्षेत्रास पूरक व्यवसायांचा विकास करणे.
७. जमिन सुधारणा कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.
८. शेती क्षेत्रात उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करणे.
९. ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांच्या संदर्भात आर्थिक व सामाजिक समानता प्रस्थापित करणे.
१०. ग्रामीण विभागातील नैसर्गिक साधने व मानवी संसाधने यांचा कार्यक्षम वापर करुन नागरिकांचे राहणीमान उंचावणे.

### ग्रामीण विकासात कृषि क्षेत्राची भूमिका :-

भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशात कृषि क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील योगदान अतिशय महत्वाचे आहे. विशेषतः ग्रामीण विकासात कृषि क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. कृषि क्षेत्रावर अवलंबून असलेली लोकसंख्या प्रामुख्याने ग्रामीण भागात वास्तव्य करते ग्रामीण विकास करावयाचा असेल तर कृषि क्षेत्राकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. भारतात नियोजनाची ६ दशके संपलेली आहेत. त्यामुळे ग्रामीण विकासात कृषि क्षेत्राची भूमिका पुढील प्रमाणे राहणार आहे.

#### १. कृषि आधारीत विविध उदयोग

ग्रामीण विकासामध्ये कृषि आधारीत उदयोगाचे विशेष महत्व आहे. शेतमालावर प्रक्रिया करणारे विविध उदयोग इतिहास काळापासून ग्रामीण भागात कार्यरत आहेत. कापड उदयोग, साखर उदयोग, तेल बिया प्रक्रिया उदयोग, दुध प्रक्रिया व दुग्धजन्न पदार्थ निर्मिती उदयोग असे अनेक उदयोग ग्रामीण विकासाचे आधारस्तंभ ठरलेले आहे. शेतमालावर प्रक्रिया केल्यास कच्चा मालाचे पक्क्या मालात रुपांतर होऊन 'वर्धित मूल्य' प्राप्त होते. या उदयोगामुळे ग्रामीण भागाचा कायापालट होण्यास मदत झाली. भारतातील महाराष्ट्रासह अनेक राज्यात कृषि आधारित उदयोगांची संख्या उल्लेखनिय आहे यादृष्टिकोनातून शेतीशी संबंधित कृषि मालावर आधारित उदयोग ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर आढळतात. प्रत्येक राज्यात ग्रामीण विभागात शेतीशी संबंधित अनेक महत्वपूर्ण उत्पादने घेतली जातात त्यावर प्रक्रिया करुन त्यांची निर्यात देखील केली जाते. त्यातून परकीय चलन मिळते. शेतकऱ्यांना रोजगार मिळतो आणि त्यांच्या उत्पन्नाचा स्तर सुधारतो.

शेतीचा सातत्याने विकास झाल्यामुळे ग्रामीण विकासावर अनुकूल परिणाम घडवून आलेला आहे. ग्रामीण भागातील नागरिकामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यामध्ये कृषि क्षेत्राची भूमिका लक्षणीय ठरलेली आहे.

#### २. अन्नधान्याचा पुरवठा:-

भारतासारख्या ग्रामीण विभागाचे प्राबल्य असलेल्या देशात ग्रामीण विकास घडवून येत असताना अन्नधान्याच्या उत्पादनात मोठया प्रमाणावर वाढ झाली याचे श्रेय कृषि क्षेत्राच्या कार्यक्षमतेकडे आणि उत्पादकतेकडे जाते हे मान्य करावे लागेल. ग्रामीण व शहरी भागातील लोकसंख्येस लागणारा अन्नधान्याचा पुरवठा कृषि क्षेत्रातून केला जातो. ग्रामीण विकासात सक्रिय लोकसंख्येच्या व त्यावर अवलंबुन असलेल्या उर्वरीत लोकसंख्येस खाद्यान्न पुरविण्याची जबाबदारी अर्थातच कृषि क्षेत्रावर आहे.

हरित क्रांतीच्या पूर्वी भारतासारख्या कृषि प्रधान अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रास अन्नधान्याची आयात करण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. हरित क्रांतीनंतर देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. आर्थिक विकासाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या दरडोई उत्पन्नात सातत्याने वाढ होत गेली. अल्पविकसित राष्ट्रांत अन्नधान्यांची मागणी मुळातच कमी असते. दरडोई उत्पन्नात वाढ झाल्यामुळे अन्नधान्याच्या मागणीत मोठी वाढ होते अशा देशातील अन्न धान्याची उत्पन्न लवचिकता खूप जास्त असते. याचा अर्थ कृषि क्षेत्रात सातत्याने विक्रेय वाढावा निमार्ण झाला नाही तर अर्थव्यवस्थेत अन्नधान्याची समस्या निर्माण होते. त्यामुळे कृषि क्षेत्र महत्वाची भूमिका बजावते.

#### ३. रोजगार निर्मिती:-

ग्रामीण भागात ग्रामीण विकास होत असताना कृषि क्षेत्राच्या सहकार्यामुळे ही विकास प्रक्रिया अधिकच प्रभावी व सक्षम बनलेली आहे. ग्रामीण विभागातील लोकसंख्येला उत्पादक रोजगार मिळवून देण्यासाठी कृषि क्षेत्राची कामगिरी दखल घेण्यासारखी राहिली आहे. भारतासारख्या विकसनशील देशात विकासाच्या प्रक्रियेमधून रोजगार वृध्दीचा दर वाढत नाही. या स्थितीत रोजगाराच्या संधी वाढविणाऱे क्षेत्र म्हणून कृषि क्षेत्राकडे पाहिले जाते. शेती क्षेत्रात रोजगाराच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संधी मोठया प्रमाणावर उपलब्ध

होतात. शेतीत काम करणारा शेतकरी, शेतमजूर व शेतीस पूरक सेवा पुरविणारे असंख्य घटक यांचा विचार केल्यास रोजगाराचे व्यापक क्षेत्र कृषि क्षेत्रात आढळते. त्यामुळे देशातील एकूण श्रमशक्तीच्या ५८.२ % श्रम शक्तीस कृषि क्षेत्रात रोजगार मिळतो त्यामुळे ग्रामीण भागातील कुशल व अकुशल मनुष्य बळास मोठया प्रमाणावर रोजगाराच्या संधी मिळतात.

### ४. परकीय चलनाची बचतः-

ग्रामीण विकासाचा विचार करताना कृषि क्षेत्राचे यासंदर्भातील योगदान फार महत्वाचे मानले पाहिजे. अन्नधान्याच्या आयातीवर अवलंबून राहण्याचा दुसरा तोटा म्हणजे कृषि विकासाच्या प्ररेणेवर होणारा विपरीत परिणाम होय. देशात आयात केलेल्या अन्नधान्याची उपलब्धतता धान्याच्या किंमती कमी करते व त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनास प्रेरणा देत नाही. हे लक्षात घेतले पाहिजे ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनातून शेतीची भूमिका सातत्याने सकारात्मक राहावी हीच अपेक्षा असते.

वाढत्या लोकसंख्येची खाद्यान्नाची गरज पूर्ण करण्यासाठी अन्नधान्याची आयात करण्यात येते. प्राप्त परिस्थितीत लोकसंख्येचा उपजिविकेचा प्रश्न महत्वाचा ठरतो त्यामुळे अनेक अल्प विकसित राष्ट्रांनी अन्न धान्याची आयात केलेली आहे. वाढत्या आयातीमुळे देवघेवीचा समतोल प्रतिकुल बनतो व परकीय चलनाची समस्या निर्माण होते. अन्न धान्याची आयात करण्यासाठी भांडवल वस्तु व तंत्रज्ञान यांची आयात थांबविली तर त्याचा आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. देशांत सातत्याने कृषि उत्पादनात वाढ झाल्यामुळे अन्न धान्याची आयात करण्याची गरज राहिली नाही व त्यामुळे परकीय गंगाजळी वरील ताण देखील निर्माण झाला नाही. एकूणच परकीय चलनाच्या बचत दृष्टीने कृषिची भूमिका ग्रामीण विकासासाठी महत्वाची ठरते.

### ५. नवीन तंत्रज्ञान व आधुनिकिकरण :-

औदयोगिक क्रांतीचा प्रभाव उदयोग क्षेत्रासोबतच कृषि क्षेत्रावर देखील झालेला दिसून येतो. शेतीमधील पारंपारिक तंत्राची जागा अलिकडे आधुनिक व उच्च तंत्रज्ञानाने घेतलेली आहे. आर्थिक विकासाचा मार्ग आहे उच्च तंत्रज्ञानाशी जोडलेला आहे. कोणत्याही क्षेत्रात उच्च तंत्रज्ञान पोहचले की त्या क्षेत्राची प्रगती होणे निश्चितपणे ठरलेले असते. कृषि क्षेत्र देखील त्यास अपवाद नाही.

नवीन तंत्रज्ञानाचा परिणाम शेतीतील अवजारे, उपकरणे यावर देखील झालेला आहे. शेतीतील तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनशैलीवर परिणाम झाला. ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण वाढले व कौशल्यात वाढ झाली. आधुनिकिकरण वाढले एकूणच शेतीच्या तंत्रज्ञानात्मक विकासाचा परिणाम ग्रामीण विकासावर झालेला आहे. कृषि क्षेत्रातील हे बदल ग्रामीण विकासाकरीता वरदान ठरले असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

### ६. स्थलांतरावर निर्बंध :-

ग्रामीण विकासात कृषि क्षेत्राच्या प्रगतीमुळे ग्रामीण परिसरातील नागरिक ग्रामीण विभागात स्थिरावला. शहरी संस्कृतीचे वाढते आकर्षण यामुळे अनेक देशांत शहरे वाढली व शहरीकरणाची प्रक्रिया अत्यंत गतिमान बनली भारतात देखील शहरे वाढत आहेत आणि स्थलांतर देखील खेडयांकडून शहराकडे होत आहे. परंतु ग्रामीण विकासामुळे त्यांची गती कमी आहे. महात्मा गांधीजींनी भारतीय खेडयांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. कृषि क्षेत्राचा विकास झाल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळाला शिवाय ग्रामीण विकासामुळे त्याचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली शहराचे व शहरीकरणाचे अनेक प्रश्न आहेत शहरी सुविधा खेडयातच मिळाल्या तर ग्रामीण भागातील नागरिक शहरात स्थलांतर करणार नाहीत आणि शहराचे योग्य नियोजन करणे शक्य होईल. कृषि क्षेत्रामुळे ग्रामीण विकासास हातभार लागला तर गांधीजींची ग्राम स्वराज्याची व खेडयांची संकल्पना साकारण्यास मदत होईल.

### ७. गुंतवणूकीत वाढः-

कृषि क्षेत्रामुळे ग्रामीण विभागात मोठी गुंतवणूकी झालेली दिसून येते ही खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातून झालेली आहे. शेतीमध्ये कायमस्वरुपाच्या सुधारणा करण्यासाठी अशी गुंतवणूक केली जाते. सरकार शेती क्षेत्राचा विकास करण्याच्या उद्देशाने सातत्याने गुंतवणूक करीत असते. देशाच्या प्रथम पंचवार्षिक योजनेपासून ते १२ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंत शेतीवरील सार्वजनिक खर्चात सतत वाढ झाली आहे. भारतीय शेतीस पायाभूत सुविधा पुरविण्याची गरज गुंतवणूकीच्या माध्यमातून विशद केली आहे. देशातील कृषि आधारित उदयोगामध्ये खाजगी व्यक्ती, सहकारी संस्था व सरकारची गुंतवणूक आहे. कृषि क्षेत्रातील गुंतवणूकीचा अत्यंत चांगला परिणाम ग्रामीण विकासावर झाला आहे. शेतकऱ्यांची खरेदी शक्ती वाढली ग्रामीण भागातील लोकसंख्येच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे औदयोगिक क्षेत्रात उत्पादन झालेल्या वस्तूंची मागणी वाढली ही दोन्ही क्षेत्रे परस्परांना पूरक असल्यामुळे कृषि क्षेत्रात केलेल्या गुंतवणूकीचे परिणाम अन्य क्षेत्राच्या तुलनेत जास्त प्रभावी ठरतात. त्यामुळे कृषि क्षेत्रातील गुंतवणूकीमुळे ग्रामीण विकासास चालना मिळाली आहे.

### सारांश :-

कृषि क्षेत्राच्या संदर्भात देशपातळीवर विचार केला तर या क्षेत्राचा संबंध जास्तीत जास्त ग्रामीण भागाशी जोडला जातो. देशातील मोठी लोकसंख्या या भागात राहते. शेतीची अल्प उत्पादकता व साधारण विकास असताना ग्रामीण विकासाची गतीही बेताचीच होती आणि ग्रामीण लोकसंख्येचे सापेक्ष दारिद्रय देखील जास्तच होते. जसा जसा कृषि क्षेत्राचा विकास होत आहे. तशी ग्रामीण विकासाची स्थिती बदलताना दिसत आहे व ग्रामीण भागातील नागरिकांच्या राहणीमानाचा स्तर सुधारत आहे. तसेच शेतीशी संलग्न यांत्रिकीकरण व नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यामुळे ग्रामीण विकासावर त्याचा अनुकूल परिणाम होत आहे. शेती क्षेत्राच्या विकासामुळे ग्रामीण विकास झालेला आहे. तसेच भविष्य काळात तो उत्तरोत्तर वाढत राहील ही अपेक्षा करण्यासारखी परिस्थिती आहे.

ग्रामीण विकासाचा उद्देश हा खेडयांचा सर्वांगीण विकास हा आहे. ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय असल्यामुळे शेतीचा विकास करताना अन्य क्षेत्रांना सोबत घेणे हे देखील अभिप्रेत आहे. सहकाराचा वाढता प्रसार व प्रचार ग्रामीण भागात सकारात्मक बदल घडवून आणू शकेल. खेडयातील प्रत्येक घटकाचा विकास करणे हाच ग्रामीण विकासाचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे कृषि क्षेत्राचा विकास म्हणजेच ग्रामीण भागाचा विकास याबाबत दुमत असू शकत नाही.

**संदर्भः-**

१) विकास व पर्यावरणाचे अर्थशास्त्र : डॉ. विश्वास कदम
२) भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था : प्रा. अशोक बोरीकर
३) ग्रामीण समाजशास्त्रः डॉ दा. धो. काचोळे
४) Rural Development: Dr. I. Satyasunderam
५) Indian Economy: S. K. Mishra & V. K. Puri.
६) Indian Economy: Rudra Datta, K. P. M. Sundaram
७) Indian Rural Problem: Narang Ashok
८) http://www.ruraldevelopment.com